# *महाराष्ट्र विधानसभा*

*दिवसाच्या कामकाजाचा क्रम*
*गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०१७*
*(सकाळी ११.०० वाजता)*

*एक : प्रश्नोत्तरे.*

*दोन : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.*

*तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).*

*चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :*

*(१) सर्वश्री भास्कर जाधव, अजय चौधरी, विजय औटी, सुनिल शिंदे, सुनिल प्रभू, राजन साळवी, ॲड. भीमराव धोंडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण शहराच्या वेगवेगळया भागात दिनांक. ३० डिसेंबर, २०१६ ते ८ जानेवारी, २०१७ या कालावधीत अवैध तस्करीसाठी ३७ सोफासेटमध्ये कोट्यवधी रुपये किंमतीच्या सुमारे १४ टन रक्तचंदन लपविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, त्यासाठी शहराजवळील मिरजोळी गावच्या हद्दीत पत्र्याची शेड उभारून रक्तचंदन लपवून सोफासेट बनविण्याचा सुरु असलेला कारखाना, हा कारखाना गत काही वर्षांपासून सुरू असल्याने अन्य राज्यांतून वाहनांमधून एवढया मोठया प्रमाणात रक्तचंदन आणले जात असताना एकदाही कारवाई न झाल्याने तपासणी नाक्यांवर होणाऱ्या तपासणीबाबत निर्माण झालेली शंका, दक्षिणेकडील राज्यातून आणण्यात आलेले रक्तचंदन स्थानिकांच्या माध्यमातून समुद्र मार्गे परदेशात पाठविण्यात येणार असल्याचा व्यक्त होत असलेला संशय, मुख्य सुत्रधाराचे नाव समजूनही वन विभाग तसेच पोलीस तपास यंत्रणांना त्याचा शोध न लागणे, तसेच उरण, जि.रायगड येथील जेएनपीटी बंदरातील जेडब्ल्युआर कंटेनर गोदामात बेकायदा रक्त चंदनाचा साठा मुलतानी माती असल्याच्या बनावाखाली लपविण्यात येणे, कोट्यवधी रुपये किंमतीच्या रक्त चंदनाची राजरोसपणे तस्करी होत असतांनाही पोलीस व डीआरए विभागाला रक्त चंदनाच्या तस्करीतील आरोपींना पकडण्यात येत असलेले अपयश, नागरिकांमध्ये तस्कर, वन अधिकारी व पोलीस यांचे आर्थिक संगनमत असल्याचा वाढता संशय, असे असतानाही या तस्करी प्रकरणाचा तपास अचानक थांबविण्यात आल्याने गुन्हेगारांना शासनाने अभय दिल्याची निर्माण झालेली भावना, अवैध रक्त चंदनाची तस्करी करणाऱ्यांविरुध्द तात्काळ कारवाई करण्याबाबत शासनाने*

*करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(२) सर्वश्री मनोहर भोईर, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, अमित देशमुख, अब्दुल सत्तार, अमर काळे, मो. आरिफ (नसीम) खान, सुनिल केदार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"तळोजा औद्योगिक परिसरातील कारखाने विघातक व विषारी पाणी सोडून जलवायू प्रदूषण करीत असल्याने या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सिध्दीविनायक या मच्छि कारखान्यातील विषारी पाणी घोट व कासाडी नदीच्या पात्रात सोडल्याने या कंपनीच्या परिसरातील घोट, घोटचाल, भोईपाडा, देवीचा पाडा, तोंडरे, पेंधर, नावडे कॉलनी, तळोजा फेज १ व तोंडरे इ. २५ गावातील नागरिकांना आजाराची झालेली लागण, तसेच विहिरी व बोअरवेलचे पाणी प्रदूषित होणे, नदीतील मासळी नष्ट होऊन शेतीचे होत असलेले नुकसान, परिणामी तेथील पारंपारिक मच्छिमार व शेतकरी यांच्यावर आलेली उपासमारीची वेळ, याबाबत मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी संबंधित कंपनीवर कारवाई करण्याची पत्राद्वारे मागणी करुनही याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, तसेच सदर औद्योगिक वसाहतीमधील प्रदुषित पाणी नावडा खाडीत सोडल्यामुळे नावडा ते खारघर कोपरा खाडीमधील खारफुटी नष्ट होणे, मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनी रासायनिक प्रक्रिया करुन घातक जैविक कचऱ्याचे विघटन करीत असल्याने होणाऱ्या वायू दुर्गंधीमुळे नागरीकांना कान, नाक, घसा व डोळे यांच्या आजारांची झालेली लागण, यासंदर्भात नागरीकांनी तक्रार करुनही संबंधीत कंपन्यांवर शासनाने कोणतीही कारवाई न करणे, परिणामी नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(३) सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, अमीन पटेल, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. राहुल बोंद्रे, हर्षवर्धन सपकाळ, श्रीमती निर्मला गावित, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री.नितेश राणे, शरद सोनावणे, कालीदास कोळंबकर, सरदार तारासिंह, किसन कथोरे, संदीप नाईक, जितेंद्र आव्हाड, बळीराम सिरसकर, संजय केळकर, शशिकांत शिंदे, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, मो.आरिफ (नसीम) खान, अब्दुल सत्तार , शेख आसिफ शेख रशीद, ॲड. यशोमती ठाकूर,डॉ. पतंगराव कदम, श्री. संग्राम थोपटे,श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. वैभव पिचड, सुनिल प्रभू, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. हसन*

*मुश्रीफ, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, पांडुरंग बरोरा, सुनिल शिंदे, राजन साळवी, संदीपानराव भुमरे, बाळासाहेब मुरकुटे, दत्तात्रय भरणे, राणाजगजीतसिंह पाटील, विनायकराव जाधव-पाटील, ॲड. भीमराव धोंडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे राज्य उत्पादन शुल्क मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"अहमदनगर जिल्हा सामान्य रूग्णालयाच्या कॅन्टीनमध्ये बनावट दारू निर्मितीचा व्यवसाय सुरु असल्याचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ रोजी निदर्शनास येणे, जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या कॅन्टीनमधील बनावट दारु पांगरमल येथील लोकांनी सेवन केल्यामुळे दहा लोकांचा झालेला मृत्यु, सदर ठिकाणी पोलीसांनी टाकलेल्या छाप्यात विविध कंपन्यांचे बुच, प्लास्टिक कव्हर, रिकाम्या बाटल्या, थिनर, चॉकलेटी फुड कलर असे बनावट दारु तयार करण्याचे साहित्य जप्त करणे, गत अनेक वर्षापासून जिल्हा रुग्णालयाच्या कॅन्टीनमध्ये वैद्यकीय अधिकारी व पोलिसांच्या संगनमताने सदर बनावट दारु तयार करण्याचा व्यवसाय सुरु असल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली भिती, परिणामी याची उच्चस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*पाच : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस).*

*सहा : सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री. बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, शशिकांत शिंदे, प्रा. विरेंद जगताप, श्री. जितेंद्र आव्हाड, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. भास्कर जाधव, अब्दुल सत्तार, दिलीप सोपल, अमिन पटेल, राणा जगजितसिंह पाटील, सुनिल केदार, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री. गोपालदास अग्रवाल, राहुल मोटे, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. दत्तात्रय भरणे, मो.आरिफ नसीम खान, वसंतराव चव्हाण, मधुकरराव चव्हाण, राजेश टोपे, डी.पी.सावंत, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. हसन मुश्रीफ, हनुमंत डोळस, शिवेंद्रसिंह भोसले, अवधुत तटकरे, कालिदास कोळंबकर, डिः एस. अहिरे, संग्राम जगताप, विजय भांबळे, बसवराज पाटील, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, रणजित कांबळे, नितेश राणे, कुणाल पाटील, पांडुरंग बरोरा, काशिराम पावरा, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, अमर काळे, अमित झनक, श्रीमती अमिता चव्हाण, डॉ. संतोष टारफे, श्री. शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. अस्लम शेख, संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, जयकुमार गोरे, प्रदीप जाधव-नाईक, संदीप नाईक, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-*

*"कधी नापिकी, तर कधी पुरेसे उत्पादन होऊनही रास्त दर मिळत नसल्याने शेतकरी संकटात आलेला असणे, व्यापाऱ्यांची चलाखी आणि शेतीविषयक बदलणाऱ्या सरकारी धोरणांमुळे शेतकरी अडचणीत येणे, त्यात नोटाबंदीची पडलेली भर परिणामी राज्यातील कृषीमाल व तो पिकविणारा शेतकरी अजूनही अडचणीत येणे, जिल्हा बँकावर लादलेल्या निर्बंधामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था डबघाईला येणे, लागोपाठ तीन वर्षातील दुष्काळाचा मोठा फटका राज्यातील साखर उद्योगासोबत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसणे, ऊसाच्या पिकात झालेली घट परिणामी सुमारे सहा हजार कोटी रुपयांच्या उत्पन्नाला मुकावे लागणे, त्याचबरोबर साखर कामगार, ऊसतोड कामगार, वाहतूकदार, छोटे व्यापारी यांना पोहचलेली झळ, डॉ.स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीकडे करण्यात आलेले दुर्लक्ष, घसरलेल्या दरामुळे ऊस, कापूस, तूर, धान, कांदा, टोमॅटो, सोयाबीन, भाजीपाला तसेच संत्रा व केळी उत्पादक शेतकरी बाधित होणे, यावर्षी कडधान्यात झालेली वाढ, परिणामी कडधान्य बाजारभाव गेल्या पाच वर्षातील निचांक पातळीवर जाणे, शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी दराने व्यापाऱ्यांकडून सुरु असलेली खरेदी, शासनाने निर्यात बंदी केल्यामुळे कांदा उत्पादकांची झालेली कोंडी, हमी भावापेक्षा कमीदराने करण्यात आलेली तुरीची खरेदी, हवामान आधारित फळ पीक विम्याचा हप्ता शासनाने न भरल्यामुळे हजारो शेतकरी विम्याच्या लाभापासून वंचित राहणे, ठिबक सिंचनाचे ६२२ कोटी रुपयाचे अनुदान देण्याबाबत दिलेल्या आश्वासनाची पुर्तता न होणे, कोरडवाहू शेती अभियानाच्या आर्थिक तरतुदीत ८० टक्क्याहून अधिक करण्यात आलेली कपात, अपघात योजनेची ५० टक्के रक्कमही शेतकऱ्यांना न मिळणे, योजनेतील निकषामुळे शेतकरी लाभापासून वंचित राहणे, कृषी विभागात हजारो रिक्त पदांचा असलेला अनुशेष, परिणामी योजनांची अंमलबजावणी होण्यास येणाऱ्या अडचणी, खरेदी केंद्रावरील आवक वाढल्याने दिनांक ५ जानेवारी, २०१७ पासून नाफेडकडून उडीद खरेदी बंद करण्यात आल्यामुळे खाजगी व्यापाऱ्यांनी उडदाचे दर पाडणे, सुमारे दोन महिने प्रतिक्षा करुनही टोमॅटोच्या दरात वाढ न झाल्याने शेतकऱ्यांनी शेतातील टोमॅटोची उभी रोपे उखडून टाकणे, नोटाबंदीमुळे शेतकऱ्यांना व्यापाऱ्यांकडून मिळणारे धनादेश त्यांच्या खात्यात जमा केले तर बँकांनी कर्जवसूलीसाठी त्यांची केलेली अडवणूक, शासनाच्या धोरणामुळे मत्स्यव्यवसाय अडचणीत आला असून मच्छिमार बांधवांवर आलेली उपासमारीची पाळी, पर्ससीन नेटद्वारे करण्यात येणाऱ्या मासेमारीमुळे सामान्य मच्छिमार अडचणीत येणे, दुधाची भाववाढ करणे, याकरिता व्यवस्थापन सुधारणा करण्याची आवश्यकता, राज्यात गेल्या दोन वर्षात आठ हजारहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती कृषी व शेतकरी कल्याण विभागाच्या केंद्रीय राज्यमंत्र्यांनी संसदेत देणे, वर्ध्यात राबविण्यात आलेल्या पथदर्शी प्रकल्पाची राज्यात अंमलबजावणी न होणे, याकरिता राज्यातील शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्याची नितांत आवश्यकता, याकडे*

*शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी.*

*सात : शासकीय विधेयके :*

*(अ) पुर:स्थापनार्थ :-*

*सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७.*

--------------------------------------------------------------------------------
-------

*(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-*

*(१) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. अमीन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, संजय कदम, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. दिपक चव्हाण, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, संदिप नाईक, अबु आझमी, जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, राहुल मोटे, सुरेश लाड, हसन मुश्रीफ, पांडुरंग बरोरा, जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."*

*(ख) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७.*

*(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

---

(२) (क) *भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. अमीन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, संजय कदम, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. दिपक चव्हाण, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, संदिप नाईक, अबु आझमी, जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, श्रीमती दिपिका चव्हाण, विजय वडेट्टीवार, राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, राहुल मोटे, सुरेश लाड, हसन मुश्रीफ, पांडुरंग बरोरा, जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ — महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."*

(ख) *सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ — महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७.*

(ग) *विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३ — महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

(घ) *विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३ — महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

(ङ) *विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, सुनील केदार, अमर काळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३ — महाराष्ट्र*

*ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३ — महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*आठ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-*

*(गुरुवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु चर्चा न झाल्यामुळे पुढे ढकलण्यात आलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) (सूचना क्र. १)*

*(१) श्री. अजय चौधरी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.*

*" महाराष्ट्र गृहनिर्माण प्राधिकरणाच्या अंतर्गत मुंबई शहर व उपनगरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांची जिवीत व वित्त हानी टाळण्यासाठी म्हाडाच्या ३३ (७) अधिनियमान्वये अनेक इमारतींचा पुर्नविकास प्रलंबित असणे, सदर इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी विकासकाने ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन सुमारे ८ ते १० वर्षांचा कालावधी होऊनही इमारतींच्या पुनर्विकासाचे काम प्रलंबित असणे, इमारतीमधील रहिवाशांची पर्यायी व्यवस्था संक्रमण शिबीरात न करता अन्य ठिकाणी सोय करुन त्याचे भाडे रहिवाशांना देण्यात न येणे, परिणामी रहिवाशांमध्ये पसरलेला असंतोष, त्यामुळे शासनाने जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाची कामे तसेच झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतील कामे मुदतीत पुर्ण न करणाऱ्या विकासकांवर कारवाई करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या नियम ३३(७) व ३३(१०) यामध्ये बदल करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(मंगळवार, दिनांक ७ मार्च, २०१७ रोजीच्या बॅलटव्दारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्र. २ व ३)*

*(२) श्री. कुणाल पाटील, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.*

*" राज्यात महसूल जमाबाबत दर तीस वर्षांनी होणारी जमाबंदी सन १९३० पासून न होणे, ब्रिटीश काळात डोंगर, नाले, टेकडया, वहिवाट रस्ते, नैसर्गिक तलाव या विविध करणांमुळे लागवड योग्य नसलेल्या जमिनीचा पोटखराब म्हणून तसेच इतर जमिनीची लागवड योग्य जमीन म्हणून नोंद करण्यात येणे, आजही राज्यात लागवड योग्य असूनही महसूल दप्तरी पोटखराब म्हणून नोंद असलेल्या हजारो हेक्टर जमिनीवर शासन महसूल आकारत नसल्यामुळे खरेदी-विक्रीच्या वेळी शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान, अनेक वर्षापासून शेतकऱ्यांच्या लागवड योग्य असलेल्या परंतु पोटखराब म्हणून नोंद असलेल्या जमिनीची नोंद लागवड योग्य जमीन म्हणून करुन सन १९३० नंतर न झालेली जमाबंदी करण्याची होत असलेली मागणी, राज्यातील शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर पोट खराब म्हणून असलेली नोंद काढण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.*

*(३) श्री.नरेंद्र पवार, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.*

*"अंबरनाथ (जि. ठाणे) येथील वालधुनी नदीच्या पात्रातील बेकायदेशीर अतिक्रमणामुळे दिनांक २६ जुलै, २००५ रोजी आलेल्या पुरामुळे पाण्याचा निचरा न होणे, तसेच स्थानिक कारखान्यातील रसायन मिश्रीत पाणी नदी पात्रात सोडल्यामुळे असे पाणी परिसरातील नागरीकांच्या घरामध्ये शिरणे, याबाबत स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आणि प्रदुषण नियंत्रक मंडळाकडे नागरिकांनी तक्रार करुनही त्यांनी कोणतीच कार्यवाही न केल्याने नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*विधान भवन,*
*मुंबई,*
*दिनांक : ८ मार्च, २०१७*

*डॉ. अनंत कळसे,*
*प्रधान सचिव,*
*महाराष्ट्र विधानसभा.*